# अतिवृष्टीचे संकट का धडा १० ऑगष्ट २००५

या वर्षी महाराष्ट्रात सर्वदूर शतकातील मोठा पाऊस पडला. एका महिन्यात किती तरी ठिकाणी वार्षिक सरासरी ओलांडली. माणसाला ही आपत्ती वाटते. पण निसर्गाच्या दृष्टीतून पर्यावरण पूर्ववत करण्याचा हा एक प्रयत्न आहे. निस्र्ग प्राण्यामधे भेदभाव करत नाही. त्याला सर्व प्राणी (भूचर, जलचर, खग) सारखेच प्रिय. आपल्या पूर्वजानी कांही चांगल्या प्रथा पाडल्या. आपल्यातील कित्येक लोक ह्या प्रथा आजही पाळतात. जसे घरावर घास ठेवणे, गाईला घास चारणे, पाण्यात घास सोडणे, मुंग्या निघाल्या तर पीठ किंवा साखर टाकणे, नागाला दूध पाजणे, बैलाना निदान पोळ्याला पूरणपोळी चारणे वगैरे. या मागील विचार हाच कीं, इतर प्राण्यानाही आपल्या परीने जगण्यास मदत करणे. देव (किंवा निसर्ग कांहीही नावाने त्याला संबोधा) असे केल्याने खूष होऊन माणसाची इच्छापूर्ती करतो अशी ज्ञानी लोकानी लालूच जरूर दाखवली. परंतु, अज्ञानी लोकाना शास्त्रीय मार्गाने समजाऊन सांगण्यात त्याना अपयश आल्याने त्याना नाइलाजाने हा मार्ग निवडावा लागला.

माणसाने खाडी, समुद्र, नदी नाल्यात राडा रोडा, निरनिराळ्या प्रकारचा कचरा, आणि सर्वात कहर म्हणजे 'प्लॅस्टिक' टाकून वाहते पाणी बंद केले, प्रदूषीत केले. भराव टाकून इमारती बांधल्या. पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद केले. जमीनीतील हजारो वर्षाचे निसर्गाने साठवलेले पाणी कांही वर्षात उपसले. इतर प्राण्याना जगणे दुष्कर केले. मग निसर्गाला राग कां येऊ नये? तेंव्हा अतिवृष्टी हे संकट नसून निसर्गाने मनुष्याला समजावण्या करता वाजवलेली घंटा आहे. असे समजून जर मानवाने आपल्या आचरणात सुधारणा केली तर निसर्ग संतुष्ठ होऊन वरदान देईल. निसर्गाचे वरदान स्वीकारण्यास आपली झोळी भक्कम ठेवा.

मानवाने हा धडा समजुन तयारी केली तर निदान भविष्यात तरी अतिवृष्टी हे संकट न वाटता वरदान वाटेल. नुकत्याच मंजूर केलेल्या आपत्ती (नियोजन) प्राधिकरणाने फक्त आपत्कालीन उपाय योजनेचा विचार करण्या ऐवजी दोन भागात उपाय सुचवावेत. पहिला आपत्ती येऊच नये या करता व दुसरा जर आलीच तर नुकसान कमीत कमी करण्या करता. मला खालील मुद्दे महत्वाचे वाटतात. त्या मध्ये भर टाकता येईल तसेच काही मुद्दे खोडून टाकावे लागण्याचीही शक्यता आहे.

१. वापरल्या नंतर कचरा म्हणून टाकल्या जाणाऱ्या वस्तू नैसर्गिकरित्या नष्ट होणाऱ्या असाव्यात. कांही वस्तू नैसर्गिकरित्या नष्ट होणाऱ्या नसतील परंतु त्यांचा वापर अपरिहार्य असेल तर त्यांचा कचरा पूर्णपणे गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्याची विश्वसनीय व्यवस्था सुचवावी व कोठल्याही परिस्थितीत आचरणात आणावी.
२. शहरातील/गांवातील खाड्या, नद्या, नाले, ओव्हळ वगैरेंच्या सर्व बाजुनी पाण्याची धोका दायक (पूररेषा) पातळी ३०० मि. मि. जाडीच्या कॉन्क्रीट पदपाथाने आखून घ्यावी. पदपाथ व पाणी या मध्ये कसल्याही प्रकारचा भराव अथवा बांधकाम करू नये, करू देऊ नये व केल्यास कोठलीही पूर्व सुचना न देता पाडून टाकावी, पाडण्याचा व कचरा लांब नेऊन टाकण्याचा खर्च भराव/बांधकाम करणाराने द्यावा तसेंच न दिल्यास कोठल्याही मार्गाने वसूल करावा.
३. पूररेषेच्या आतील सध्या अस्तित्वात असलेल्या बहुमजली इमारतीतील पुरात बुडु शकणारे (संभाव्य) मजले रिकामे करून त्याच्या सर्व भिंती पाडून टाकाव्यात. बाकी मजल्यावरील नागरिकानाही ती इमारत रिकामी करम्याची विनंती करावी.
४. दरवर्षी जमा होणारा गाळ काढण्या करता यंत्रणा कार्यरत असावी. ज्या शेतकऱ्याला हा गाळ हवा असेल त्याला जागेवर हा गाळ मोफत द्यावा. शेतकऱ्याने स्वखर्चाने गाळ आपल्या शेतात न्यावा.

५. पावसाचे जस्तीत जास्त पाणी जमिनीत मुरवावे अगर पंपाने तळी बनवून त्यात साठवून ठेवावे. पाणी मुरवण्या करता फक्त डोंगर, डोंगर उतार, शेत जमीन यांचाच विचार करू नये. नागरी वस्ती, सर्व प्रकारचे मार्ग, नदी, नाले, ओहोळ, धरणे, कालवे यांचाही विचार व्हावा. त्या करता जलभरण तंत्राचा विकास करावा. पृथ्वीच्या पोटात सुरक्षित खोली खाली कोट्यावधी लिटर पाणी साठवता येईल.

६. नुकत्याच पावसा मुळे आलेल्या आपत्ती मध्ये वाहतुकीची त्रुटी मोठ्या प्रमाणात जाणवली. त्याचा खोल अभ्यास करून उपाय शोधण्याची नितांत गरज आहे. रस्ता, रेल्वे रूळ, पूल बऱ्याच ठिकाणी पाण्यात गेले. अशी सर्व ठिकाणे ओळखून त्या वर उपाय करणे निकडीचे आहे. बऱ्याच ठिकाणी दरडी कोसळून रस्ते रोखले गेले. नैसर्गिक डोंगर उतार सरळ उभे नसतात. त्याना मातीच्या गुणधर्मा प्रमाणे उतार असतात. या कडे दुर्लक्ष झाले आहे. एक तर मातीच्या गुणानुसार उतार हवा अगर मातीचे गुण बदलले पाहिजेत किंवा सक्षम भिंती बांधल्या पाहिजेत. मुंबई सारख्या शहरावर नुकत्याच आलेल्या आपत्तीहून महाभयंकर आपत्ती समुद्रातून येऊ शकते. त्या वेळी कमीत कमी वेळात तेथून नागरिकाना हलवण्याची तरतूद केलीच पाहिजे. सध्याची आपत्ती ही भविष्यात येऊ शकणाऱ्या आपत्तीची धोक्याची घंटा समजली पाहिजे.

७. याच बरोबर आपत्ती आलीच तर काय करावे याचा विचार झाला पाहिजे. लोकाना हलवण्याची व्यवस्था, त्याच्या निवाऱ्याची व्यवस्था, खाण्या पिण्याची व्यवस्था, चोऱ्या मारामाऱ्या रोखण्याची व्यवस्था वगैरे किती तरी संभाव्य प्रश्नाची उत्तरे हाती लागत असली पाहिजेत.

हे फक्त मुद्दे आहेत. हे व आणखी बऱ्याच मुद्द्यावर सखोल विचार झाला पाहिजे. असे झाले तर आपत्ती (नियोजन) प्राधिकरणाने आपले काम परिपूर्ण पणे केले असे म्हणता येईल